मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: 9834138482



# रक्ताच्या नात्यांपलीकडे मायेची राखी! मुलांच्या चेहऱ्यावर फुलले हास्य

## तत्वम सोशल फाउंडेशनचा चिंचवडमधील गुरुकुलममध्ये अनोखा रक्षाबंधन!

» पिंपरी | प्रतिनिधी

**रक्ताच्या नात्यांपलीकडे जाऊन समाजातील उपेक्षित घटकाला प्रेमाची आणि आपुलकीची ऊब देणे हीच खरी सणांची सार्थकता असते, याचा प्रत्यय चिंचवड येथील पुनरुत्थान समरसता गुरुकुलममध्ये आला. वंचित, भटके आणि विमुक्त समाजातील मुलांच्या चेहऱ्यावर उत्सवाचा खरा आनंद फुलवण्याच्या उदात्त भावनेतून 'तत्वम सोशल फाउंडेशन'च्या वतीने गुरुकुलममधील तब्बल 350 मुला-मुलींसोबत अनोखा रक्षाबंधन सोहळा आणि स्नेहभोजनाचा संवेदनशील उपक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.**



उपक्रमादरम्यान ‘तत्वम सोशल फाउंडेशन’च्या वतीने आणलेल्या विविध रंगांच्या आणि आकर्षक राख्यांनी गुरुकुलममधील वातावरण अक्षरशः भावूक झाले होते. रक्षाबंधनाच्या निमित्ताने गुरुकुलमधील मुलींनी तेथील मुलांच्या मनगटावर मायेची राखी बांधत भाऊ-बहिणीच्या नात्याची सुंदर वीण जपली. केवळ गुरुकुलमधील मुलांनाच नव्हे, तर या उपक्रमासाठी उपस्थित असलेल्या फाउंडेशनच्या पदाधिकाऱ्यांनाही मुलींनी राखी बांधली. या क्षणी रक्ताचे कोणतेही नाते नसतानाही आपुलकी, प्रेम आणि विश्वासाच्या नात्याची अनुभूती सर्वांना आली.

राखी बांधताना मुलांच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद, उत्साह आणि कुतूहल वातावरण अधिकच प्रसन्न करणारे होते. अनेक मुला-मुलींसाठी हा अनुभव केवळ सण साजरा करण्यापुरता मर्यादित न राहता आपल्यासाठीही समाजात आपुलकीने उभे राहणारी माणसे आहेत, हा विश्वास देणारा ठरला. त्यामुळे रक्षाबंधनाच्या या उपक्रमाला सामाजिक बांधिलकीची भावनिक जोड मिळाली.

रक्षाबंधन हा केवळ भाऊ-बहिणीच्या नात्याचा पारंपरिक सण नसून, समाजातील दुर्लक्षित, वंचित आणि उपेक्षित घटकांप्रती माणुसकी, आदर आणि जबाबदारीची भावना दृढ करण्याची संधी आहे. समाजातील प्रत्येक घटकाला सन्मानाने आणि आपलेपणाने जगण्याचा अधिकार आहे, हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. नात्यांची व्याख्या केवळ रक्ताच्या नात्यांपुरती मर्यादित नसून, संकटाच्या आणि गरजेच्या वेळी जो मायेचा हात पुढे येतो, तेच खरे नाते असते, ही भावना यावेळी प्रकर्षाने अधोरेखित झाली.

याप्रसंगी ज्येष्ठ विचारवंत व समाजसेवक पद्मश्री गिरीशकाका प्रभुणे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. वंचित, भटके आणि विमुक्त समाजातील मुलांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी केवळ शासकीय योजनांपेक्षा समाजातील संवेदनशील नागरिकांनी पुढे येऊन त्यांच्याशी आत्मीयतेचे नाते निर्माण करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. अशा उपक्रमांमुळे मुलांच्या मनातील न्यूनगंड दूर होण्यास मदत होते आणि त्यांच्यामध्ये समाजाविषयी विश्वासाची भावना निर्माण होते, असेही त्यांनी नमूद केले.

तत्वम सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून सुशिक्षित तरुण वर्ग एकत्र येऊन सामाजिक जबाबदारीचे भान जपत आहे, ही समाधानाची बाब असल्याचे गिरीशकाका प्रभुणे यांनी सांगितले. सामाजिक कार्य हे केवळ एखाद्या दिवसापुरते किंवा सणापुरते मर्यादित न राहता सातत्याने सुरू राहिले पाहिजे. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत प्रेम, शिक्षण, आधार आणि संधी पोहोचवण्यासाठी अशा सेवाकार्याची गरज असून, हे कार्य अविरत सुरू ठेवावे, असे आवाहन त्यांनी केले.

### “चिमुकल्यांचे हास्य हीच सामाजिक कार्याची ताकद”

तत्वम सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष रवींद्र ठिकेकर म्हणाले की, सणांचा खरा आनंद हा केवळ आपल्या कुटुंबापुरता मर्यादित न ठेवता समाजातील दुर्लक्षित आणि वंचित घटकांसोबत तो वाटून घेतल्यावरच मिळतो. गुरुकुलमधील या चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर उमटलेले हास्य हीच आमच्या सामाजिक कार्याची खरी प्रेरणा आणि ताकद आहे. या मुलांसोबत निर्माण झालेले आपुलकीचे नाते भविष्यात आणखी घट्ट करण्याचा आमचा प्रयत्न राहणार आहे.

# नैराश्यातील जीवांना टोकाचे पाऊल उचलण्यापासून रोखणारा नटराज

» पिंपरी | प्रतिनिधी

**आयुष्याच्या वाटेवर संकटांनी घेरलेली, नैराश्य आणि प्रचंड मानसिक तणावाखाली वावरणारी अनेक माणसं आधाराच्या शोधात असतात. अशा हताश मनांना योग्य दिशा दाखवून टोकाचे पाऊल उचलण्यापासून रोखण्याचे अनोखे कार्य मूळचे कर्नाटक येथील ज्योतिष अभ्यासक नटराज आमले मागील बारा वर्षांपासून सातत्याने करत आहेत. सध्या पूर्णानगर परिसरातील पदपथावर बसून लोकांचे समुपदेशन करणाऱ्या आमले यांचे कुठेही कायमस्वरूपी वास्तव्य नसते; मात्र जिथे जातील तिथे तणावग्रस्त आणि गोरगरीब लोकांच्या पाठीशी ते खंबीरपणे उभे राहतात.**




ज्योतिषशास्त्राचा आधार घेत नटराज आमले केवळ भविष्यवाणी करण्यापुरते स्वतःचे कार्य मर्यादित ठेवत नाहीत, तर संकटात सापडलेल्या आणि मानसिकदृष्ट्या खचलेल्या व्यक्तींना आधार देण्याचे काम करतात. आर्थिक अडचणी, कौटुंबिक वाद, व्यवसायातील नुकसान, नात्यांमधील तणाव किंवा भविष्यातील अनिश्चितता यामुळे अनेक जण नैराश्यात जातात. अशा व्यक्तींशी शांतपणे संवाद साधून त्यांच्या अडचणी समजून घेणे आणि सकारात्मक विचार करण्यासाठी प्रोत्साहन देणे, यावर आमले भर देतात.

केवळ कुंडली पाहिल्याने किंवा ज्योतिषशास्त्राचा अभ्यास केल्याने एखाद्याचे नशीब एका रात्रीत बदलत नाही, असा त्यांचा ठाम विश्वास आहे. मात्र, योग्य मार्गदर्शन आणि सकारात्मक दृष्टिकोनामुळे व्यक्तीला मानसिक समाधान मिळू शकते. कठीण परिस्थितीतून मार्ग काढण्याचा आत्मविश्वास निर्माण होणे महत्त्वाचे असून, निराश व्यक्तींना परिस्थितीशी दोन हात करण्याचे बळ देण्याचा ते प्रयत्न करतात.

बदलत्या तंत्रज्ञानामुळे ज्योतिषशास्त्राकडे पाहण्याची पद्धतही बदलली आहे. पूर्वी लग्नकार्य, वास्तुपूजा किंवा अन्य शुभकार्यांसाठी पंचांग, तिथी, नक्षत्र आणि मुहूर्ताचा सखोल अभ्यास केला जात असे. मात्र, आता मोबाईलवर राहुकाळ किंवा शुभ-अशुभ वेळ पाहून अनेक जण निर्णय घेतात. ज्योतिषशास्त्र हे अत्यंत सूक्ष्म अभ्यासाचे क्षेत्र असून कुंडलीचे विश्लेषण तज्ज्ञ व्यक्तीकडूनच करून घेणे आवश्यक असल्याचे आमले सांगतात.

भौतिक सुखाच्या मागे धावताना वाढणारा मानसिक तणाव आणि एकटेपणावर मात करण्यासाठी संवाद आणि सकारात्मक विचारांची गरज आहे. त्यामुळे कुठलेही कायमस्वरूपी कार्यालय नसतानाही नटराज आमले गेल्या बारा वर्षांपासून पदपथावर बसून लोकांशी संवाद साधत आहेत. साध्या पद्धतीने सुरू असलेले त्यांचे हे काम अनेक तणावग्रस्त आणि हताश व्यक्तींसाठी आशेचा किरण ठरत आहे.

# श्रेया घोषाल यांना 'आशा भोसले पुरस्कार'

## आशाताईंच्या नावाचा सन्मान श्रेया घोषाल यांच्या शिरपेचात!

**पिंपरी | प्रतिनिधी**

**संघर्ष, साधना म्हणजे आशाताई भोसले, अशा महान व्यक्तींच्या नावाचा पुरस्कार मिळणे हा माझ्यासाठी अत्यंत मोठा सन्मान आहे. लतादीदी, आशाताई, हृदयनाथजी आणि उषाताई यांची गाणी ऐकून मी मोठी झाले. संगीतातील "सा" देखील यांच्यामुळेच शिकले. मी स्वतःमध्ये आशाताई आणण्याचा प्रयत्न करते. माझे पहिले मराठी भाषेतील गाणे 'गणराज रंगी नाचतो' हे रेकॉर्ड झाले तेंव्हा मी १३ वर्षाची होते. आशाताईंची गाणी ऐकून मला प्रेरणा मिळते. भाऊसाहेब भोईर यांच्या निमंत्रणाचा मी स्वीकार करते आणि लवकरच पिंपरी चिंचवड शहरासाठी एक सांगीतिक कार्यक्रम करेल असे आश्वासन आंतरराष्ट्रीय ख्यातीची गायिका श्रेया घोषाल यांनी "२१ वा आशा भोसले पुरस्कार" स्वीकारल्यानंतर मनोगत व्यक्त करताना दिले.**




अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, पिंपरी-चिंचवड शाखा, पिंपरी-चिंचवड कलारंग प्रतिष्ठान आणि सिद्धिविनायक ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय स्तरावर संगीत क्षेत्रात उल्लेखनीय योगदानाबद्दल दिला जाणारा यावर्षीचा २१ वा प्रतिष्ठित 'आशा भोसले पुरस्कार २०२६' सुप्रसिद्ध पार्श्वगायिका श्रेया घोषाल यांना ज्येष्ठ संगीतकार पं. हृदयनाथ मंगेशकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. शनिवारी (दि. २९) चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात भव्य पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, पिंपरी-चिंचवड शाखेचे अध्यक्ष भाऊसाहेब भोईर, आमदार अमित गोरखे, माजी महापौर व ज्येष्ठ नगरसेवक योगेश बहल, पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, उद्योजक कृष्ण कुमार गोयल, नगरसेवक गौरव घुले यांच्यासह मानसी भोईर-घुले, वंदना घांगुर्डे, रुणाल सांकला, दिलीप काटकर, हर्षवर्धन भोईर, किरण येवलेकर, राजू बंग, गौरी लोंढे आदी मान्यवर उपस्थित होते.

पुरस्काराच्या स्वरूपात श्रेया घोषाल यांना १ लाख ११ हजार रुपयांची रोख रक्कम, शाल, श्रीफळ आणि सन्मानचिन्ह पं. हृदयनाथ मंगेशकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. तसेच पैठणीचा मान मानसी भोईर-घुले यांच्या हस्ते करण्यात आला.

पं. हृदयनाथ मंगेशकर यांनी श्रेया घोषाल यांना आशीर्वाद देताना सांगितले की, "मी श्रेयाला लहानपणापासून पाहत आलो आहे. सर्वप्रथम षण्मुखानंद हॉलमध्ये माझेच गाणे गाताना मी तिला पाहिले होते. तेव्हाच तिला 'तू खूप छान गाते' असा आशीर्वाद दिला होता." यावेळी त्यांनी भाऊसाहेब भोईर यांनी आमदार व्हावे, अशी इच्छाही व्यक्त केली.

आमदार अमित गोरखे यांनी आपल्या भाषणात भाऊसाहेब भोईर यांचा उल्लेख शहराचे 'सांस्कृतिक मंत्री' असा केला. "भाऊसाहेब भोईर यापूर्वीच भाजपमध्ये आले असते, तर आज ते राज्याचे सांस्कृतिक मंत्री झाले असते. अजूनही वेळ गेलेली नाही," असे गोरखे म्हणाले. त्यांच्या या वक्तव्याला उपस्थित प्रेक्षकांनी उत्स्फूर्त टाळ्यांचा कडकडाट करून प्रतिसाद दिला.

स्वागत व प्रास्ताविक करताना भाऊसाहेब भोईर म्हणाले, "या सांगीतिक प्रवासाचा श्वास लतादीदी आहेत, तर उच्छ्वास आशादीदी आणि याचे हृदय म्हणजे पं. हृदयनाथ मंगेशकर आहेत." लता मंगेशकर यांना देश ज्या सन्मानाने 'दीदी' म्हणतो, त्याचप्रमाणे आता श्रेया घोषाल या आमच्या 'छोटी दीदी' आहेत, असेही त्यांनी सांगितले.

पिंपरी-चिंचवड शहरात श्रेया घोषाल यांचा सांगीतिक कार्यक्रम आयोजित करण्यासाठी त्यांनी वेळ द्यावा, असा आग्रह भाऊसाहेब भोईर यांनी केला. यावर श्रेया घोषाल यांनी हात उंचावून सकारात्मक प्रतिसाद देत लवकरच पिंपरी-चिंचवड शहरासाठी सांगीतिक कार्यक्रम करण्याचे आश्वासन दिले.

पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सांगितले की, आशा भोसले यांच्या नावाने दिला जाणारा हा प्रतिष्ठित पुरस्कार म्हणजे केवळ एका कलाकाराचा सन्मान नसून, पिंपरी-चिंचवड शहराचाही गौरव आहे.

पुरस्कार वितरण सोहळ्यानंतर मोरया थिएटर निर्मित 'आशा से श्रेया तक' या विशेष सांगीतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी श्रेया घोषाल यांच्या हस्ते मानसी भोईर-घुले यांच्या 'मानसी रेस्कोर' या बँडचे अनावरण करण्यात आले. त्यानंतर आशा भोसले आणि श्रेया घोषाल यांच्या गाजलेल्या सदाबहार गीतांची सुरेल मैफल रंगली. या संगीत मैफलीचा रसिकांनी मनमुराद आनंद लुटला. यावेळी मानसी भोईर-घुले यांनीही आपल्या गायनाने रसिकांची दाद मिळवली.

### लतादीदींपासून श्रेया घोषालपर्यंत; दिग्गजांचा 'आशा पुरस्कार'

गुरुवर्य अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी रक्षाबंधनाचा सण केवळ भावंडांपुरता मर्यादित न ठेवता समाजाचे रक्षण करणाऱ्या पोलिसांना समर्पित केला. विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या राख्या चिखली पोलीस स्टेशनमध्ये जाऊन पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मनगटावर बांधल्या. चिमुकल्यांच्या या प्रेमळ उपक्रमाने पोलिसही भारावून गेले. यावेळी पोलिसांनी विद्यार्थ्यांना सुरक्षितता, शिस्त, जबाबदारी आणि वाहतुकीच्या नियमांचे महत्त्व पटवून दिले. खाकी वर्दी आणि चिमुकल्यांमधील या रेशमी नात्याने उपस्थितांची मने जिंकली.

---

# पिंपरी-चिंचवड शहर जिल्हा भाजपाची कोअर कमिटी जाहीर

**पिंपरी | प्रतिनिधी**

**भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पिंपरी-चिंचवड शहर जिल्हा भाजपाची नवीन कोअर कमिटी जाहीर करण्यात आली आहे. प्रदेश सरचिटणीस निरंजन डावखरे यांच्या स्वाक्षरीने नुकतीच ही कार्यकारिणी घोषित करण्यात आली आहे.**



या नवीन कोअर कमिटीमध्ये शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे, जिल्हा प्रभारी भरत पाटील, सरचिटणीसपदी मोरेश्वर शेडगे यांच्यासह मधुकर बच्चे, विकास डोळस आणि वैशाली खाडे यांचा समावेश करण्यात आला आहे. तसेच आमदार महेश लांडगे, आमदार शंकर जगताप, आमदार उमा खापरे आणि आमदार अमित गोरखे यांनाही कोअर कमिटीमध्ये स्थान देण्यात आले आहे. महापौर रवी लांडगे, माजी खासदार अमर साबळे, माजी आमदार अश्विनी जगताप आणि माजी जिल्हाध्यक्ष सदाशिव खाडे यांचाही या समितीत समावेश करण्यात आला आहे.

शहरातील पक्ष संघटनेतील अनुभवी नेते, विद्यमान लोकप्रतिनिधी तसेच विविध स्तरांवर काम करणाऱ्या पदाधिकाऱ्यांना एकत्रितपणे जबाबदारी देण्यात आल्याने या नव्या कोअर कमिटीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. आगामी काळातील संघटनात्मक निर्णय, पक्षविस्तार, स्थानिक पातळीवरील प्रश्न आणि विविध राजकीय तसेच सामाजिक उपक्रमांबाबत ही समिती महत्त्वाची भूमिका बजावणार असल्याचे मानले जात आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात भाजपची संघटनात्मक ताकद आणखी वाढविण्यासाठी नव्या पदाधिकाऱ्यांसमोर मोठी जबाबदारी असणार आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्षाची बूथपातळीवरील यंत्रणा मजबूत करणे, कार्यकर्त्यांमध्ये समन्वय वाढविणे, नव्या कार्यकर्त्यांना पक्षाशी जोडणे आणि नागरिकांच्या प्रश्नांवर प्रभावीपणे काम करणे, यावर नव्या टीमचा भर राहण्याची शक्यता आहे.

या नियुक्त्यांमुळे पिंपरी-चिंचवड शहरातील भाजप संघटनेला अधिक बळकटी मिळणार असल्याची चर्चा पक्ष कार्यकर्त्यांमध्ये सुरू झाली आहे. अनुभवी नेत्यांसोबत विद्यमान आमदार आणि पदाधिकाऱ्यांचा समावेश असल्याने शहरातील विविध राजकीय आणि संघटनात्मक समीकरणांचा विचार करून निर्णय घेण्यास पक्षाला मदत होणार आहे.

दरम्यान, नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे पक्ष कार्यकर्ते, पदाधिकारी आणि समर्थकांकडून विविध स्तरांतून अभिनंदन करण्यात येत आहे. आगामी काळात पक्षाची विचारधारा, केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजना तसेच शहराच्या विकासाशी संबंधित धोरणे अधिक प्रभावीपणे नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचे आव्हान या नव्या कार्यकारिणीसमोर असणार आहे. संघटन मजबूत करून आगामी राजकीय आव्हानांना सामोरे जाण्यासाठी ही कोअर कमिटी महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्वास पक्षाच्या वर्तुळातून व्यक्त करण्यात येत आहे.

# ओबीसींच्या आरक्षणासाठी एल्गार! 1 सप्टेंबरला संघर्ष यात्रा

## मराठा आरक्षणाला विरोध नाही; ओबीसींच्या हक्काला धक्का नको, लक्ष्मण हाकेंचा इशारा

**पुणे | प्रतिनिधी**

**मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी अंतरवली सराटी येथे उपोषण सुरू केले असतानाच, ओबीसी आरक्षणाच्या संरक्षणासाठी ओबीसी समाजही आक्रमक झाला आहे. ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी १ सप्टेंबर रोजी दौंड तालुक्यातील पाटस टोलनाक्यावरून मुंबईच्या दिशेने संघर्ष यात्रा काढण्याची घोषणा केली आहे. ओबीसींचे आरक्षण अबाधित ठेवण्यासाठी समाजाने एकजूट होऊन रस्त्यावर उतरावे, असे आवाहन हाके यांनी केले आहे.**



पुण्यातील राहत्या घरी माध्यमांशी संवाद साधताना हाके यांनी मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर आपली भूमिका स्पष्ट केली. मराठा समाजाला आरक्षण देण्यास आपला विरोध नसून, ओबीसींच्या आरक्षणाला कोणताही धक्का न लावता स्वतंत्रपणे मराठा आरक्षण देण्यात यावे, अशी मागणी त्यांनी केली. मराठा आरक्षणासंदर्भात राज्य सरकारने काढलेला शासन निर्णय बेकायदेशीर असून, त्याआधारे दिली जाणारी प्रमाणपत्रे संविधान आणि कायद्याच्या विरोधात असल्याचा आरोपही त्यांनी केला.

अपात्र प्रमाणपत्रे वैध करून घेण्याचे प्रयत्न सुरू असल्याचा दावा करत हाके यांनी ओबीसी समाजाला सावध राहण्याचे आवाहन केले. “आता ओबीसी समाज एकत्र आला नाही, तर भविष्यात काहीही शिल्लक राहणार नाही. आपल्या हक्काच्या आरक्षणाच्या संरक्षणासाठी सर्व ओबीसींनी एकत्र येऊन संघर्ष करणे गरजेचे आहे,” असे हाके म्हणाले.

राज्यातील सत्ताधारी आणि विरोधक या दोघांनीही ओबीसी आरक्षणाच्या संरक्षणाबाबत गंभीर भूमिका घेतलेली नाही, असा आरोप त्यांनी केला. ओबीसींचे आरक्षण मातीत मिळविण्याचे काम सत्ताधारी आणि विरोधकांनी केले असून, सरकारने ओबीसी समाजाला वाऱ्यावर सोडले आहे, अशी टीकाही हाके यांनी केली. ओबीसी समाजाला न्याय मिळणार नसेल, तर त्यांनी जायचे कुठे, असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर ओबीसी समाजानेही आता संघर्षाची भूमिका घेतली आहे. ‘शेवटचा लढा आणि ओबीसींचे आरक्षण गाडा’ अशी जरांगे यांची भूमिका असल्याचा आरोप हाके यांनी केला. त्यामुळे ओबीसींचे आरक्षण वाचविण्यासाठी १ सप्टेंबरला पाटस टोलनाक्यावरून मुंबईच्या दिशेने निघणाऱ्या संघर्ष यात्रेत ओबीसी समाज बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

### ओबीसी आरक्षणासाठी संघर्ष यात्रा!

१ सप्टेंबरला पाटस टोलनाक्यावरून मुंबईच्या दिशेने संघर्ष यात्रेला सुरुवात होणार आहे. ओबीसींच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला स्वतंत्र आरक्षण द्यावे, अशी लक्ष्मण हाके यांची भूमिका. ओबीसी समाजाने मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन.

मराठा आरक्षण आणि ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरून राज्यातील राजकीय वातावरण पुन्हा तापण्याची चिन्हे आहेत. एका बाजूला मराठा आरक्षणासाठी आंदोलन सुरू असताना दुसऱ्या बाजूला ओबीसी समाजानेही आरक्षणाच्या संरक्षणासाठी रस्त्यावर उतरण्याचा निर्णय घेतल्याने आगामी काळात हा मुद्दा अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे.

# पुण्यात स्वाइन फ्लूचा धडाका! महिनाभरात रुग्णसंख्या ३५ वरून थेट २२५ वर

**पुणे | प्रतिनिधी**

**शहरात स्वाइन फ्लू अर्थात एच१एन१च्या रुग्णसंख्येत झपाट्याने वाढ होत असल्याने आरोग्य यंत्रणेची चिंता वाढली आहे. पुणे महापालिकेच्या आकडेवारीनुसार, जुलै महिन्यात शहरात स्वाइन फ्लूचे ३५ रुग्ण आढळले होते. मात्र, ऑगस्ट महिन्यात ही संख्या तब्बल २२५ वर पोहोचली आहे. अवघ्या एका महिन्यात रुग्णसंख्येत झालेली ही मोठी वाढ लक्षात घेता नागरिकांनी विशेष खबरदारी घेण्याचे आवाहन वैद्यकीय तज्ज्ञांनी केले आहे.**



चालू वर्षाच्या सुरुवातीला स्वाइन फ्लूचे प्रमाण अत्यल्प होते. पहिल्या तिमाहीत केवळ दोन रुग्णांची नोंद झाली होती. जानेवारी आणि मार्च महिन्यात एकही रुग्ण आढळला नव्हता. मात्र, मे महिन्यापासून रुग्णसंख्या वाढण्यास सुरुवात झाली आणि त्यानंतरच्या काळात एच१एन१चा संसर्ग वाढत गेला. जुलैमध्ये ३५ असलेली रुग्णसंख्या ऑगस्टमध्ये थेट २२५ वर पोहोचल्याने आरोग्य विभागाचे लक्ष या वाढीकडे लागले आहे.

स्वाइन फ्लूची सुरुवात अनेकदा साध्या फ्लूसारखीच होते. सुरुवातीला ताप, खोकला, सर्दी आणि घशात खवखव यांसारखी लक्षणे दिसतात. मात्र, काही रुग्णांमध्ये संसर्ग वाढल्यानंतर न्यूमोनियासारखी गुंतागुंत निर्माण होऊ शकते. त्यामुळे शरीरातील ऑक्सिजनची पातळी कमी होण्याचा धोका असतो. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, सहव्याधी असलेले रुग्ण आणि प्रतिकारशक्ती कमी असलेल्या व्यक्तींनी अधिक काळजी घेण्याची गरज असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

दरम्यान, सध्या देशात सक्रिय असलेला स्वाइन फ्लूचा विषाणू तुलनेने सौम्य स्वरूपाचा असल्याचे भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेने (ICMR) नमूद केले आहे. मात्र, आजार सौम्य असला तरी ज्येष्ठ नागरिक आणि मधुमेह, हृदयरोग, फुफ्फुसांचे आजार यांसारख्या सहव्याधी असलेल्या व्यक्तींनी संसर्ग टाळण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घेणे महत्त्वाचे आहे. गर्दीच्या ठिकाणी जाणे टाळावे आणि गरज असल्यास मास्कचा वापर करावा, असा सल्ला तज्ज्ञांनी दिला आहे.

स्वाइन फ्लूमध्ये अचानक तीव्र ताप येणे, सतत सुका किंवा कफयुक्त खोकला होणे, सर्दी, घशात खवखव किंवा गिळताना त्रास होणे, डोकेदुखी, स्नायू व अंगदुखी तसेच सतत थकवा जाणवणे अशी लक्षणे दिसू शकतात. काही रुग्णांना उलट्या किंवा जुलाबाचाही त्रास होऊ शकतो. ही लक्षणे जाणवल्यास त्याकडे दुर्लक्ष न करता डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे.

स्वाइन फ्लूपासून बचाव करण्यासाठी हात साबण आणि पाण्याने वारंवार स्वच्छ धुवावेत किंवा सॅनिटायझरचा वापर करावा. खोकताना किंवा शिंकताना रुमाल अथवा टिश्यूचा वापर करावा. गर्दीच्या ठिकाणी मास्क वापरणे फायदेशीर ठरू शकते. अस्वच्छ हातांनी डोळे, नाक आणि तोंडाला स्पर्श करणे टाळावे. सर्दी-खोकला किंवा फ्लूसदृश लक्षणे असलेल्या व्यक्तींपासून सुरक्षित अंतर ठेवावे.

### पुण्यात स्वाइन फ्लूचा वाढता धोका!

जुलै महिन्यात ३५ वर असलेली स्वाइन फ्लूच्या रुग्णांची संख्या ऑगस्टमध्ये तब्बल २२५ वर पोहोचल्याने पुण्यात आरोग्य यंत्रणेची चिंता वाढली आहे. एच१एन१चा वाढता संसर्ग लक्षात घेता नागरिकांनी गर्दीच्या ठिकाणी जाणे टाळावे, मास्कचा वापर करावा आणि स्वच्छतेची विशेष काळजी घ्यावी. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, सहव्याधी असलेले तसेच कमी प्रतिकारशक्ती असलेल्या व्यक्तींनी अधिक सतर्क राहावे. ताप, खोकला, सर्दी किंवा श्वास घेण्यास त्रास यांसारखी लक्षणे दिसल्यास विलंब न करता डॉक्टरांचा सल्ला घ्यावा, असे आवाहन वैद्यकीय तज्ज्ञांनी केले आहे.

भरपूर पाणी प्यावे आणि पौष्टिक आहार घ्यावा. शरीराची प्रतिकारशक्ती चांगली ठेवण्यासाठी पुरेशी विश्रांती घेणेही महत्त्वाचे आहे. ताप, खोकला किंवा इतर लक्षणे जाणवल्यास स्वतःहून औषधे घेण्याऐवजी वैद्यकीय तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

सन २००९ मध्ये मोठ्या प्रमाणावर आढळलेल्या स्वाइन फ्लूचा विषाणू पूर्णपणे नष्ट झालेला नसल्याने त्यामध्ये बदल होत राहतात आणि वेळोवेळी त्याचा उद्रेक होऊ शकतो. या आजारावर प्रभावी उपचार उपलब्ध असून, वेळेत निदान आणि योग्य उपचार मिळाल्यास आजार गंभीर होण्याचा धोका कमी करता येतो, अशी माहिती डॉ. अविनाश भोंडवे यांनी दिली.

नाकावाटे देण्यात येणाऱ्या लसीच्या उपलब्धतेबाबतही त्यांनी माहिती दिली. २००९-१० नंतर ही लस बाजारात उपलब्ध नसल्याचे त्यांनी नमूद केले. योग्य प्रकारे लसीकरणाचा वापर केल्यास स्वाइन फ्लूच्या वारंवार होणाऱ्या उद्रेकावर नियंत्रण मिळविण्यास मदत होऊ शकते, असेही त्यांनी सांगितले.

पुण्यात ऑगस्ट महिन्यात रुग्णसंख्येत झालेली लक्षणीय वाढ पाहता नागरिकांनी घाबरून न जाता मात्र निष्काळजीपणाही न करता आवश्यक ती खबरदारी घेणे गरजेचे आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिक आणि सहव्याधी असलेल्या व्यक्तींनी लक्षणे दिसताच वैद्यकीय सल्ला घेण्याचे आवाहन तज्ज्ञांकडून करण्यात आले आहे.

# उद्घाटनाच्या मुहूर्तासाठी हिंजवडी मेट्रोला ‘ब्रेक’!

## सीएमआरएसची सुरक्षा मंजुरी मिळूनही मेट्रो रखडली; कोंडीने आयटीयन्स हैराण

**» पुणे | प्रतिनिधी**

**हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो मार्गिकेच्या पहिल्या टप्प्यातील १२ स्थानकांची कामे पूर्ण होऊन केंद्रीय रेल्वे सुरक्षा आयुक्तांकडून (सीएमआरएस) सुरक्षा प्रमाणपत्रही मिळाले आहे. मात्र, प्रवासी सेवा सुरू करण्याऐवजी ही मेट्रो उद्घाटनाच्या मुहूर्ताच्या प्रतीक्षेत रखडल्याचे चित्र आहे. आयटी नगरीतील दररोजच्या वाहतूक कोंडीने हैराण झालेल्या नागरिकांमध्ये यामुळे तीव्र नाराजी व्यक्त होत असून, उद्घाटनाची प्रतीक्षा न करता मेट्रो सेवा तातडीने सुरू करण्याची मागणी होत आहे.**



पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) माध्यमातून माण ते बालेवाडी या पहिल्या टप्प्यातील मेट्रो मार्गाचे काम हाती घेण्यात आले आहे. या मार्गावर एकूण २३ स्थानके प्रस्तावित असून, त्यापैकी १२ स्थानकांची सर्व कामे पूर्ण झाली आहेत. तसेच, या मार्गासाठी सीएमआरएसकडून आवश्यक सुरक्षा प्रमाणपत्रही मिळाले आहे. त्यामुळे प्रवासी सेवा सुरू करण्यासाठी आवश्यक असलेली महत्त्वाची प्रक्रिया पूर्ण झालेली असतानाही मेट्रो सेवा अद्याप सुरू झालेली नाही.

हिंजवडी आणि माण परिसर हा पुण्यातील प्रमुख आयटी आणि औद्योगिक केंद्र म्हणून ओळखला जातो. या भागात दररोज हजारो कर्मचारी कामासाठी शहराच्या विविध भागांतून ये-जा करतात. मात्र, वाढत्या वाहनसंख्येच्या तुलनेत रस्त्यांची क्षमता अपुरी असल्याने सकाळ-संध्याकाळ मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होते. अनेक कर्मचारी तासन्तास वाहतूक कोंडीत अडकून पडतात. त्यामुळे त्यांचा वेळ, इंधन आणि ऊर्जा वाया जात असून, कामाच्या ताणासोबत वाहतूक कोंडीचा अतिरिक्त त्रास सहन करावा लागत आहे.

या पार्श्वभूमीवर मेट्रो सेवा हा हिंजवडीतील वाहतूक समस्येवर प्रभावी पर्याय ठरू शकतो. १२ स्थानकांचे काम पूर्ण झाले असून सुरक्षा मंजुरीही मिळाली असल्याने आता प्रवासी सेवा सुरू करण्यासाठी आणखी विलंब करण्याची गरज काय, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. केवळ उद्घाटनाच्या कार्यक्रमासाठी मेट्रो सेवा थांबवून ठेवणे योग्य नसून, नागरिकांच्या सोयीला प्राधान्य देत सेवा तातडीने सुरू करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

हिंजवडी भागातील आयटी कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या हजारो कर्मचाऱ्यांना दररोज वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो. सार्वजनिक वाहतुकीचा सक्षम पर्याय उपलब्ध झाल्यास खासगी वाहनांवरील ताण कमी होऊन रस्त्यावरील गर्दी कमी होण्यास मदत होऊ शकते. त्यामुळे मेट्रोच्या १२ स्थानकांचा नागरिकांना तातडीने लाभ मिळणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे.

“हिंजवडी भागात मोठ्या प्रमाणावर आयटी आणि औद्योगिक कंपन्या आहेत. शहराच्या विविध भागांतून कर्मचारी येथे कामासाठी येतात. मात्र, अपुरे रस्ते आणि वाढती वाहनसंख्या यामुळे दररोज वाहतूक कोंडीचा नाहक त्रास सहन करावा लागतो. १२ मेट्रो स्थानकांचे काम पूर्ण झाले असेल आणि सुरक्षा मंजुरीही मिळाली असेल, तर ही स्थानके प्रवासी वाहतुकीसाठी तातडीने सुरू करावीत,” अशी मागणी आयटी कर्मचारी सोनाली देशमुख यांनी केली.

दरम्यान, हिंजवडीतील वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत असताना तयार झालेल्या मेट्रो सुविधेचा नागरिकांना लवकरात लवकर लाभ मिळावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. उद्घाटनाच्या औपचारिकतेपेक्षा प्रवाशांची गरज महत्त्वाची असून, प्रशासनाने विलंब न करता १२ स्थानकांवर मेट्रो सेवा सुरू करण्याबाबत निर्णय घ्यावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

### १२ स्थानके तयार, प्रवासी मात्र वंचित!

१२ स्थानकांचे काम पूर्ण, सीएमआरएसची सुरक्षा मंजुरीही मिळाली; तरीही हिंजवडी मेट्रो प्रवाशांसाठी बंदच! आयटी नगरीतील वाढती वाहतूक कोंडी, तासन्तास होणारा प्रवास आणि नागरिकांचा वाढता त्रास लक्षात घेता, उद्घाटनाच्या औपचारिकतेची वाट न पाहता मेट्रो सेवा तातडीने सुरू करण्याची जोरदार मागणी.

# पुण्यात दहीहंडीचा थरार; उत्सवाला ‘सेलिब्रिटी तडका’!

**» पुणे | प्रतिनिधी**

**ढोल-ताशांचा गजर, गोविंदांच्या मानवी मनोऱ्यांचा थरार, बक्षिसांची चुरस आणि त्यात लोकप्रिय कलाकारांची दणदणीत एंट्री... यंदाचा दहीहंडी उत्सव पुणेकरांसाठी ‘सेलिब्रिटीमय’ ठरणार आहे. मराठी चित्रपट आणि मालिकांमधील लोकप्रिय कलाकारांसह सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्सचीही उपस्थिती विविध दहीहंडी उत्सवांमध्ये पाहायला मिळणार आहे. त्यामुळे गोविंदांच्या थरारासोबतच सेलिब्रिटींच्या उपस्थितीची उत्सुकता तरुणाईमध्ये वाढली आहे.**



पुणे शहर आणि उपनगरांमध्ये गेल्या काही वर्षांत दहीहंडी उत्सवाचे स्वरूप मोठ्या प्रमाणात बदलले आहे. पारंपरिक पद्धतीने साजरा होणाऱ्या उत्सवाला आता भव्य स्टेज, आकर्षक विद्युत रोषणाई, डीजे, सांस्कृतिक कार्यक्रम आणि सेलिब्रिटींच्या उपस्थितीची जोड मिळत आहे. यंदाही शहरातील विविध मंडळांकडून दहीहंडी उत्सवाची जोरदार तयारी सुरू असून, प्रेक्षकांच्या पसंतीचे कलाकार कार्यक्रमाला उपस्थित राहावेत यासाठी आयोजकांकडून विशेष प्रयत्न केले जात आहेत.

पुण्यातील मध्यवर्ती पेठांसह छत्रपती शिवाजीनगर, कोथरूड, सहकारनगर, वारजे, बावधन, धायरी, आंबेगाव, हडपसर आणि विमाननगर आदी भागांमध्ये दहीहंडीच्या कार्यक्रमांची संख्या वाढली आहे. या उत्सवांमध्ये मोठ्या संख्येने नागरिक आणि तरुणाई सहभागी होत असल्याने आयोजकांकडून कार्यक्रम अधिक आकर्षक करण्यावर भर दिला जात आहे.

विशेष म्हणजे, यंदाच्या दहीहंडी उत्सवात सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्सनाही मोठी मागणी आहे. इन्स्टाग्राम, यू-ट्यूब आणि फेसबुकवर लोकप्रिय असलेल्या डिजिटल स्टार्सना कार्यक्रमांमध्ये आमंत्रित केले जात आहे. त्यांच्या उपस्थितीमुळे उत्सवाची प्रसिद्धी केवळ कार्यक्रमस्थळापुरती मर्यादित राहत नसून सोशल मीडियावरही मोठ्या प्रमाणात होत आहे. त्यामुळे आयोजकांसाठी सेलिब्रिटी आणि डिजिटल स्टार्स हे गर्दी खेचण्यासोबतच प्रचाराचे प्रभावी माध्यम ठरत आहेत.

सेलिब्रिटी मॅनेजमेंट पाहणारे लक्ष्मीकांत गुंड म्हणाले, “मुंबईतील दहीहंडी उत्सवांमध्ये सेलिब्रिटींची उपस्थिती ही जुनीच परंपरा आहे. आता हा ट्रेंड पुण्यातही वेगाने वाढत आहे. यंदा मराठी चित्रपट आणि मालिकांमधील कलाकार, नृत्य कलाकार तसेच सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्सना कार्यक्रमांसाठी आमंत्रित करण्याला आयोजकांकडून प्राधान्य दिले जात आहे. त्यातही महिला कलाकारांची उपस्थिती विशेष आकर्षण ठरत आहे.”

मराठी कलाकारांच्या उपस्थितीसाठी आयोजकांकडून साधारणपणे एक ते पाच लाख रुपयांपर्यंत मानधन दिले जात असल्याचेही गुंड यांनी सांगितले. दहीहंडीच्या एक-दोन दिवस आधीही अनेक कार्यक्रमांमधील कलाकारांची नावे अंतिम केली जातात. त्यामुळे आगामी काही दिवसांत आणखी काही प्रसिद्ध कलाकार आणि सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्सची नावे जाहीर होण्याची शक्यता आहे.

यंदा पुण्यात नम्रता संभेराव, सायली संजीव, अक्षरा देवधर, प्रसाद खांडेकर, श्रुती मराठे, स्मिता गोंदकर यांसारख्या लोकप्रिय कलाकारांची उपस्थिती पाहायला मिळणार आहे. काही कलाकारांचे कार्यक्रम निश्चित झाले असून, आणखी काही कलाकारांच्या उपस्थितीबाबत आयोजक आणि सेलिब्रिटी मॅनेजमेंटकडून चर्चा सुरू आहे.

दहीहंडीच्या निमित्ताने गोविंदा पथकांच्या मानवी मनोऱ्यांचा थरार पाहण्यासाठी दरवर्षी मोठी गर्दी होते. त्यात यंदा लोकप्रिय कलाकार आणि सोशल मीडिया स्टार्सची भर पडल्याने उत्सवाची रंगत आणखी वाढणार आहे. त्यामुळे पुणेकरांसाठी यंदाची दहीहंडी ‘गोविंदांचा थरार आणि सेलिब्रिटींचा जलवा’ अशी दुहेरी पर्वणी ठरण्याची शक्यता आहे.